SANGLI URBAN CO-OPERATIVE BANK LTD; SANGLI
[Scheduled Co-op.Bank]
Head Office, 404, Khanbhag,
SANGLI – 416 416

since 1935
SUB का साथ, आपका विकास

सांगली अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., सांगली (शेडयुल्ड को-ऑप.बँक)
प्रधान कार्यालय, ४०४, खणभाग, सांगली - ४१६ ४१६

PHONE –2376236, 2376237, 2376238
FAX -: (0233) 2326571
WEBSITE : www.sangliurbanbank.in

जा.क्र. : प्रका/तपासणी व दक्षता/मुकाअ/ /2017-18 दिनांक : 26-04-2017

***ठेव परिपत्रक क्र.378***

प्रति,
श्री.शाखाधिकारी,
शाखा : ______

स0 न0

**विषय** : सेव्हींग / करंट खात्यावर किमान शिल्लक रक्कमेपेक्षाही कमी शिल्लक सतत एक महिना राहीलेस टाकावयाच्या चार्जेसबाबतचा सध्याचा नियम क्र.3 व क्र.17 मध्ये बदल केलेबाबत व SMS चार्जेस आकारणीचा नवीन नियम क्र.24 बाबत . . .

**संदर्भ** : ठेवपरिपत्रक क.367/2016 दि.07-04-2016

व्यवस्थापक मंडळ ठराव क्र.2/7 दि.18-04-2017 प्रमाणे सध्याचे सेव्हींग व करंट नियम क्र.अनुक्रमे 3 व 17 मध्ये बदल करणेत आला असून तसेच सेव्हींग व करंट खातेदारांना सध्या बँकेकडून देणेत येत असलेल्या SMS सुविधेसाठी सर्व्हीस चार्जेस आकारणेबाबतचा नवीन नियम क्र.24 मंजूर करणेत आला असून सुधारीत नियम पुढीलप्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| **(अ) सेव्हींग**<br>**सध्याचा नियम क्र.3** | **सुधारीत नियम क्र.3** |
| खाते चालू असेपर्यंत खात्यात किमान रु.1,000/- बाकी (शिल्लक) असले पाहीजे, यापेक्षा कमी बाकी एक महिन्यापेक्षा जास्त काळ राहीलेस बँक प्रतिवर्षी वर्षअखेरीस सदर खात्यावर रु.200/- + सर्व्हीस टॅक्ससह किंवा रु.200/- पेक्षा खातेवर जी कमीत कमी शिल्लक असेल ती रक्कम सर्व्हीस चार्जेस म्हणून आकारणेत येईल. अशी आकारणी दरवर्षी मार्च महिन्यात करणेत येईल व असे चार्जेस टाकल्यामुळे खाती बंद झालेस खातेदारास त्याबद्दल कळविणेस बँक जबाबदार राहणार नाही. | ज्या सेव्हींग खातेवर दर तिमाहीमध्ये किमान सरासरी बॅलन्स रु.1,000/- पेक्षा कमी शिल्लक राहीलेस रु.50/-+ सर्व्हीस टॅक्ससह सर्व्हीस चार्जेस म्हणून आकारणेत येईल, अशी आकारणी खातेवर दरतिमाहीस करणेत येईल व असे चार्जेस टाकलेमुळे खाते बंद झालेस खातेदारास याबद्दल कळविणेस बँक जबाबदार राहणार नाही. |
| **(ब) करंट**<br>**सध्याचा नियम क्र. 17** | **सुधारीत नियम क्र. 17** |
| ज्या चालू खातेवर किमान शिल्लक रक्कमेपेक्षा कमी शिल्लक सतत एक महिना राहील, त्या खातेवर प्रतिवर्षी रु.200/- + सर्व्हीस टॅक्ससह किंवा खातेवर जी कमीत कमी शिल्लक असेल ती रक्कम सर्व्हीस चार्जेस म्हणून आकारणेत येईल, अशी आकारणी दरवर्षी मार्च महिन्यात करणेत येईल. असे चार्जेस आकारलेमुळे खाते बंद झालेस खातेदारास याबद्दल कळविणेस बँक जबाबदार राहणार नाही. | ज्या करंट खातेवर दर तिमाहीमध्ये किमान सरासरी बॅलन्स रक्कमेपेक्षाही (वैयक्तिक खातेसाठी रु.2,000/- व फर्म इत्यादीच्या अन्य खात्यासाठी रु.5,000/-) कमी शिल्लक राहीलेस रु.50/-+ सर्व्हीस टॅक्ससह सर्व्हीस चार्जेस म्हणून आकारणेत येईल. अशी आकारणी खातेवर दरतिमाहीस करणेत येईल व असे चार्जेस टाकल्यामुळे खाते बंद झालेस खातेदारास याबद्दल कळविणेस बँक जबाबदार राहणार नाही. |

*(मागे पहा)*

सेव्हींग, करंट खातेदारांना त्यांचे खातेवर शिल्लक रक्कमेचे तसेच प्रत्येक केलेल्या जमा / नांवे व्यवहाराचे SMS करणेत येत आहेत. या सेवेबद्दल सर्व्हीस चार्जेस आकारणीबाबतचा नवीन **नियम क्र.24** पुढीलप्रमाणे राहील.

- सेव्हिंग खातेच्या व करंट खातेच्या नियमापैकी सध्याचा नियम क्र. 24 (नियमात बदल करणेचा अधिकार बँकेने राखुन ठेवला आहे) यास क्र. 25 देणेत आला असून नवीन नियम क्र.24 पुढील प्रमाणे राहील.

**(अ) सेव्हींग :-**

**नवीन नियम क्रमांक 24 :-**

सेव्हींग खातेदारास बँकेकडून दिल्या गेलेल्या SMS सुविधेबद्दल खातेवर रु.10/- सर्व्हीस चार्जेस म्हणून आकारणेत येईल. अशी आकारणी खातेवर दर तिमाहीस करणेत येईल.

**(ब) करंट :-**

**नवीन नियम क्रमांक 24 :-**

करंट खातेदारास बँकेकडून दिल्या गेलेल्या SMS सुविधेबद्दल खातेवर रु.10/- सर्व्हीस चार्जेस म्हणून आकारणेत येईल. अशी आकारणी खातेवर दर तिमाहीस करणेत येईल.

वरील नमूद नियमातील बदल हे सध्या चालू असलेल्या व नव्याने चालू होणा-या अशा सर्व सेव्हींग / करंट खात्यांना बंधनकारक राहतील. **सुधारीत नियमाची अंमलबजावणी ही दि.01-04-2017 चे तिमाही पासून करणेची आहे.** वरील नमूद चार्जेसची आकारणी डेटा सेंटरकडून दरतिमाहीस केली जाईल.

सेव्हींग व करंट ठेवीचे अन्य नियम व अटी या पूर्वीप्रमाणेच कायम राहतील.

नियमातील बदलाबाबतची माहिती सर्व खातेदारांना व्हावी, यासाठी शाखेमध्ये नोटीस बोर्डावर सोबत पाठविलेल्या सूचनेची प्रत लावणेत यावी.

कळावे,

आपले,

**मुख्य कार्यकारी अधिकारी**

सोबत : वरीलप्रमाणे.